# संदेशवहनाचे प्रभावी माध्यम मोबाईल

डॉ. नीता धर्माधिकारी
Associate Professor
G.S.College of Commerce & Economics
Nagpur, Maharashtra.

**सारांश:-**

मानवी जीवनात संदेशवहनाची क्रिया अस्तित्वात आली. संदेशवहनामुळे व्यक्तीसंपर्कात वाढ होते. संदेशवहनामुळे आपण दुसऱ्यावर प्रभाव टाकूनअपेक्षित उदिष्टे साध्य करू शकतो. मानवाच्या विकासा बरोबर संदेशवहनाच्या माध्यमांचाही विकास होऊ लागला. यात मोबाईल ह्या साधनाची उपयुक्तता काय आहे व त्याचे दुष्परिणाम काय होऊ शकतात याचा अभ्यास करण्याकरिता सदर पेपर लिहण्यात आला आहे.

**मूळशब्द:-** संदेश, मानव विकास, माध्यम

**प्रस्तावना:-**

संदेश हा सर्वांचा परिचयाचा असा शब्द आहे. संदेश म्हणजे बातमी किंवा माहिती. साध्याचे युग क्रांतीयुग आहे आजच्या क्रांतीचा परवलीचा शब्द आहे संदेशवहन, कम्युनिकेशन. सध्या सर्वात जास्त गुंतवणूक याच क्षेत्रात होतआहे. आज अर्थव्यवस्थेत त्यामुळे चालना मिळते आहे लोकांची जीवनशैली पूर्ण बदलून गेली आहे. संदेशवहनाची विविध साधन अस्तित्वात आहेत. ह्या साधनांच्या माध्यमाने दोन किंवा जास्त व्यक्तीमध्ये संदेशाची देवघेव होते. या क्रियेला “संदेशवहन” असे म्हणतात. “संदेशवहन ही सांगण्याची, ऐकून घेण्याची आणि समजून घेण्याची एक पद्धतशीर व निरंतरपणे करण्यात येणारी प्रक्रिया होय.”

संदेशवहन क्रियेचे दोन पक्ष असतात. ज्या व्यक्तिला संदेश दिलं जातो अश्या व्यक्तीला त्या संदेशाचा अर्थ समजलाच नाही तर संदेशवहनाची क्रिया पूर्ण झाली नाही असे म्हणावे लागेल. संदेश प्राप्त करणाऱ्या व्यक्तीला संदेशाचा अर्थ नीट समजला पाहिजे

संदेशाची देवघेव करण्याकरिता ज्या साधनांचा उपयोग केला जातो अशा साधनांना संदेशवहनाची मध्यम म्हणतात संदेशवहनाच्या विभिन्न माध्यमांना, संवादश्रुंखल असे म्हणतात त्यातील वाढता वापर आपल्या बदलत्या जीवनशैलीचा भाग बनला आहे. आपण मोबाईल गरजेनुसार सतत बदलत असतो. मोबाईलची उपयुक्तता त्याच्या त्रासापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. आजच्या अद्ययावत संदेशवहनाच्या यंत्रणेची तुलना २० वर्षापूर्वीच्या परिस्तिथीशी केले असता धक्का बसतो. कारण, आधी आपण दूरध्वनी(लँडलाईन) सेवा घेत होतो. त्याची स्तिथी अत्यंत बिकट होती. प्रतीक्षा यादी, रॉंग नंबर, क्रॉस कनेक्शन, ट्रंककॉल्ससाठी प्रतीक्षा व फोन दर जास्त होते. या क्षेत्रात घडलेल्या आणि घडत असलेल्या लक्षणीय घडामोडींमुळे टेलिफोन सेवेचा चेहरामोहरा बदलला. “मोबाईल” फोनमुळे केवळ भौगोलिक नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थिती बदलली आहे. नागरिकांना त्यांच्या गरजा भागविणे त्यांच्या हातातील लहानश्या मोबाईलद्वारे शक्य होतात.

**अध्ययन पद्धती:-**

हा पेपर पूर्णतः द्य्याम स्त्रोतावर आधारित आहे

**संशोधनाच उद्देश:-**

१. मोबाईलच्या महत्वाचे अध्ययन करणे.
२. मोबाईलच्या दुष्परिणामाचे अध्ययन करणे

**मोबाईलच महत्व जाणून घेणे.**

**मोबाईलचे महत्व:-**

१. **बँक व्यवहार:-** मोबाईलने पारंपारिक फोनला समर्थ पर्याय देऊ केलेच आहे; पण भावी काळात संगणकाच्या जोडीला अन्य प्रसारमाध्यमांना सुद्धा मोबाईल फोन आपल्यामध्ये सामावून आहे

मोबाईल फोनमार्फत तुमच्या बँकेचे सर्व व्यवहार करता येतात. जागत तुम्ही कुठेही प्रवास करीत असाल, तरी तुमच्या बँकेच्या खात्यात किती रक्कम शिल्लक आहे, कोणती घेणी आहेत, वगैरे माहिती ताबडतोब मिळवू शकता. तसेच खाण्यापिण्याच्या वस्तू व अन्य भेटवस्तू घरपोच मागवू शकता. त्याचे पैसेही लगेच द्यावे लागत नाही. क्रेडीटकार्डच्या खरेदीप्रमाणे तुमच्या फोनच्या बिलमधून तुमच्या खरेदीचे पैसे भरण्याची सोय सुद्धा उपलब्ध आहे

२. **साधनः-** सध्या आपण WAP वायरलेस अप्लिकेशन प्रोटोकॉल आणि SMS म्हणजे शॉर्ट मेसेज सर्व्हिस मार्फत मोबाईलवरून इंटरनेटशी संपर्क साधू शकतोच शिवाय छापील संदेशची अदलाबदल करू शकतो. जेणेकरून तोंडी सूचना देऊनसुद्धा अपेक्षित फोननंबर लावला जाऊ शकतो पुढील संभाषण करणाऱ्या दोन व्यक्ती परस्परांना त्यांच्या मोबाईलच्या पडद्यावर बघूसुद्धा शकतात सूचना दुसऱ्यांनाSMS द्वारे संदेश व सूचना देण्यात येतात.

**३. वाचनाची सुविधा:-** मोबाईल फोन मार्फतच वाचनाची सेवा आपल्याला उपलब्ध होऊ शकतील. पुस्तके, मासिक, वर्तमानपत्रे हे यावर वाचता येतात विद्यार्थांनाही हवी ती माहित नेटद्वारे उपलब्ध होते सध्या मोबाईल फोनधारकांच्या संख्येतवाढ झालेली आहे.

**४. ग्रामीण भागात संपर्क:-** खेड्यापाड्यात आणि देशाच्या अंतर्गत भागातून पारंपारिक टेलीफोनचे जाळ पुरेसे विकसित न झाल्याने तिथल्या जनतेनेसुद्धा मोबाईल फोनला जवळ केलेले आहे. त्यांच्या मालाला बाजारपेठ त्वरित प्राप्त होऊ शकते.

**५. त्वारित संपर्काचे साधनः-** कोणत्याही ठिकाणी व्यक्तीशी संपर्क त्वरित करता येते आणि निरोपाची देवाण-घेवाण करता येते.

**६. पाकशास्त्राची माहिती:** गृहिणींना पाकशास्त्राची माहिती घरबसल्या केंव्हाही बघू शकतात. यामुळे कुटुंबातील व्यक्तींना त्या खुश ठेऊ शकतात.

**७. कमी वेळात संपर्क:-** कोणत्याही व्यक्तीशी अप्लावधीत संपर्क मोबाईलद्वारे साधता येतो त्यामुळे वेळेचा अपव्यय टाळतो.

**८. कमी खर्चाचे साधनः-** मोबाईल हा घर मध्ये प्रत्येक सदस्याच्या हातात दिसून येतो कारण त्याकरिता खर्च कमी येतो आणि काम जास्त साधता येते म्हणून त्याची लोकप्रियता अधिक आहे. वेग-वेगळया ऑपद्वारे आपण टॅक्सी घरपोच खाण्याची सोय तिकिटे या व्यतिरिक्त विविध सुविधाही उपलब्ध होतात

**मोबाईलचे वापराचे दुष्परिणामः-**

**१. कामात व्यत्ययः-** नाट्यगृह, कचेऱ्या, सार्वजनिक वाहतुकीची साधन, पर्यटनस्थळ एवढंच नव्हे तर विधानसभा, लोकसभेतही मोबाईल फोनचा रिंगमुळे वारंवार हस्तक्षेप होत असतो. टॅक्सी, हॉटेलमध्ये मोबाईल फोन विसरण्याच प्रमाणही वाढत आहे. वारंवार होणाऱ्या रिंगमुळे आजूबाजूच्या लोकांच्या कामात व्यत्यय येऊ शकतो व कामाचा खोळंबा होतो.

**२. आरोग्य:-** मोबाईल फोनच्या अतिवापरामुळे शरीरास धोका निर्माण होऊ शकतो. त्याच्यातील किरणांमुळे अपाय होऊ शकतो विस्मरण, बहिरेपणा, डोकेदुखी ई त्रास होऊ शकतो.

**३. रचना:-** मोबाईल फोनची रचना महिलांच्या वेशभूषेच्या दृष्टीकोनातून सुयोग्य नाही ते हाताळतांना त्रास होतो. पर्समध्ये ठेवला असता रिंगटोन ऐकु येत नाही

**४.अपघाताची भीती:-** वाहन चालवित असतांना मोबाईलचा वापर करणे धोक्याचे असते. अपघात होण्याची भीती असते.

**५. गुन्हेगारी वाढण्याची शक्यता:-** संघटीत गुन्हेगारी आणि अन्य बेकायदेशीर उद्योगासाठीही मोबाईलचा पुरेपूर वापर करून घेतल्याचे आपण बघत आहोच.

**६. व्हायरस:-** मोबाईल मध्ये व्हायरस येऊन यंत्रणा निकामी होऊ शकते. मोबाईल बंद असल्यास संपर्क साधने कठीण होतो

**७.आत्मविश्वाची कमतरता:-** मोबाईलमध्ये नवीन पिढी गुंतून राहिल्याने त्यांच्यातील आत्मविश्वास कमी होईल.एकलकोंडा, निरुत्साही हे अवगुणत्यांच्यात येऊ शकतात.

**८. गोपनीयता अभावः-** माहितीची गोपनीयतता कमी होण्याची संभावना राहते. चुकीने बटन दाबली तर सर्वत्र माहित पसरण्याची भीती राहते.

**निष्कर्ष:-**

वरील काही दुष्परिणाम जरी होत असेल तर योग्य वापर केला तर संदेशवहनाचे प्रभावी माध्यम म्हणजे मोबाईल आहे. कारण आज अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यात या माध्यमाचे योगदान फार मोठे आहे.

**संदर्भ:-**

१. व्यावसायिक संदेशवहन आणि व्यवस्थापन- प्रा.एस. एम.कोलते.
२. मासिक.
३. वर्तमानपत्र.
४. बिझिनेस कॉमुनिकेशन, डॉ. राय
५. बिझिनेस कॉमुनिकेशन, डॉ. भांडवलकर